गझल - नित्य

तथास्तु २०७५
पान - ३१

१३५७

नित्य फुलायचे आहे आणि झुलायचे आहे
जगणाऱ्या श्वासामध्ये उरी सलायचे आहे १

नित्य उडायचे आहे आणि पडायचे आहे
मातीतल्या देहासंगे इथे (असे) सडायचे आहे. २

नित्य चालायचे आहे आणि बोलायचे आहे
मुक्या वेदनांचे पाश डोई झेलायचे आहे ३

नित्य खेळायचे आहे आणि पळायचे आहे
कर्तृत्वाच्या धमणींना हळू जळायचे आहे ४

नित्य सोसायचे आहे आणि पोसायचे आहे
सारे जाणून जोखून पुन्हा फसायचे आहे. ५

कशासाठी हा प्रपंच, रंगाविण रंगमंच ?
वेषभूषा सोबतीला व्यर्थ खुलायचे आहे. ६

२६।६।७ सहदेव मखामले

नित्य पेलायचे आहे आणि डुलायचे आहे
रंगी बेरंगी जगाला असे भुलायचे आहे - ५